**Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):03**
**ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU**
**International open-access peer-reviewed refereed monthly journal**
**https://knowledgeableresearch.com/index.php/1**

# आदिवासी लोकगीतांतील स्त्री जाणिवा'व कृत्रिम बुद्धिमत्ता

प्रा.डॉ.पंजाब लक्ष्मण शेरे*
मराठी विभागप्रमुख,बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट जि.नांदेड

**शोध सार**

*एकेकाळी केवळ विज्ञान कथेत शोभणारी संकल्पना आज वास्तवात येऊ लागली आहे. उदाहरणार्थ रिमोटवर चालणाऱ्या खेळण्यांच्या गाड्या पासून ते स्वतः निर्णय घेणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर चालणाऱ्या मोटारी पर्यंतचा प्रवास मानवी कल्पनाशक्ती आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे द्योतक आहे. ही गोष्ट आता सतत चर्चेत असून कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नोकऱ्या सर्जनशीलता आणि जागतिक अर्थव्यवस्था कशी बदलणार यावर सुद्धा सर्व संबंधांचे लक्ष वेधून घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेत 'वर्ल्ड मॉडेल' म्हणजे अशी प्रणाली जी वास्तवाची रचना,वस्तू, नातेसंबंध, भौतिक नियम आणि कृतीचे परिणाम शिकवण्यावर भर देत आहे.*

**बीज शब्द:** *वाचन संस्कृती, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, वाचन संस्कृतीतील बदल.*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
प्रा.डॉ.पंजाब लक्ष्मण शेरे
**Email:** panjashere5@gmail.com

**स्वरूप**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर आज अनेकजनाना कविता,कथा, विविध स्वरूपात लेखन उपलब्ध होत आहे.लेखक मनावर झालेल्या परिणामातून विचार करून समाजात सामाजिक बांधिलकी जोपासणारी भावना कलाकृतीतून व्यक्त करीत असतो जे वास्तव आहे ते मांडत आसतो.कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक आभासी यंत्र आहे. तुम्हाला हवे ते देईल पण कृत्रिम सवरूपाचे असेल आपण त्या गोष्टी स्वीकारल्या पाहिजे किंवा नाही याचा विचार करायला हवा.

आदिवासी लोकगीतामधील स्त्री जाणीवा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे दोन भिन्न टोकांचे विषय वाटू शकतात, परंतु तंत्रज्ञानाच्या युगात त्यांचा एक अतिशय रंजक संगम होऊ शकतो.

डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी असे म्हटले की, "लोकगीते एका व्यक्तीने रचलेली असली, तरी त्यातील आशय व्यक्तीचा न राहता, समोरच्याचा होतो. एकावेळी अनेक लोकगीतांची निर्मिती करीत असतात, अशी कल्पना आपणास करता येईल; पण त्याऐवजी सांघिक निर्मितीची उपपत्ती अधिक ग्राह्य मानली जाते"१ सण-उत्सवाच्याप्रसंगी एकत्र आल्यानंतर लोकांची मानसिक बौद्धिक प्रक्रिया विशिष्ट रूप धारण करताना दिसते आणि त्याच अवस्थेत लोकगीते रचली जातात अशा प्रकारे झालेली निर्मिती सांघिक पुनर्निर्मिती असते अशी लोकगीते समाजात लोकप्रिय असतात त्याचे पुन्हा पुन्हा गायन होत असते त्यामध्ये फेरबदल करून नवीन शब्दांची भर घालण्याची लोकांची धडपड दिसते हे मौखिक परंपरेने शक्य असते आशयापासून ते सादर करेपर्यंत सर्व समूहावर अवलंबून असते. लोकगीतातून सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब व्यक्त झालेल्या असतात पारंपारिक सण उत्सव जत्रा लोक रंजन प्रताप जोपासणारे नृत्य गायन यातून त्याच्या संस्कृतीची ओळख होते ."लोकगीतातून व्यक्त झालेली अनुभूती भावनेवर आधारलेली असते म्हणून ती अनुभूती असामान्य, अण्णांनी साधारण असून तिचा प्रत्यय समाजातील सर्व घटकांना येत असतो भावानुभव लोकसाहित्यातून व्यक्त होत असल्याने त्यावर कुण्या एका व्यक्तीचा ठसा उमटलेला जाणवत नाही ते अनुभव विश्व समाजाचे झालेले असते"२

लोकगीता मध्ये ढोबळ पण असला तरी लोकमानसावर त्याद्वारे संस्कार केले जातात निर्मळ भावा ,अनुभव आविष्कृत झाल्याने माणसाच्या मनाला ती अधिक भागतात आणि लोकप्रिय देखील

होतात त्यातून माणसाची सुखदुःखे भावना सरदार इत्यादीचा अंतर्भाव होतो.

आदिवासी लोकगीतातील स्त्री जाणिवा' शोधत असताना आदिवासी स्त्री जीवन हे  निसर्गनिष्ठ आहे. काबाड कष्ट करून ते आपला संसार गाडा ओढत असतात. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ती काम करत असते आपले दुःख सावळायचे असेल तर कष्ट केल्याशिवाय पर्याय नाही असा निदान ती व्यक्त करीत असते जीवनाची व्यथा कुणासमोर मांडावी आपली व्यथा कोण ऐकणार असे दुःखाचे ओझे घेऊन ती दारिद्र्याचा सामना करते अजूनही आदिवासी स्त्री जीवनाची कहाणी फारसा बदल झालेला नाही खेड्यापाड्यात वाड्या, तांडयावर राहणाऱ्या लोकांची कारूण्यमय अवस्था आहे. उदरनिर्वाहासाठी डिंक तेंदूपत्ता लाकडाची मोळी मध जंगलातून जमा करून शहरात आणि विकतात व आपल्या संसाराचा गाडा ओढतात टोपली विणणे वेगवेगळया नक्षीदार वस्तूंची निर्मिती करणे ते श्रम गीता द्वारे आपल्या जीवन व्यथा हलक्या करतात स्वनिर्मिती करून वस्तू बाजारात विकून जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करतात .काही गावांना तर अजूनही रस्ता नाही. शहरांमध्ये येण्यासाठी त्यांना फार श्रम घ्यावा लागतो. म्हणून आदिवासी लोकगीते लोक माणसांचे, लोक रुढीचे, लोक विधींचे, लोक परंपरेचे चित्रण करणारे आहे असेच म्हणावे लागेल. ही लोकगीते अभ्यासकांना विचार करायला लावणारी आहेत .त्यांची शब्द सामर्थ्य प्रगल्भ असून त्यांचा अर्थ जीवनाशी निगडित असतो. ही लोकगीते आजच्या विज्ञानवादी युगामध्ये विचार प्रवृत्त करणारी आहे. त्यामुळेच ती संचित आहे .आदिवासी स्त्री जीवन व्यथा लोकगीतातून येत असल्यामुळे त्यांचे संकलन करणे आणि त्यातून स्त्री जाणीवा टिकून ठेवणे व पुढच्या पिढीला हा मौखिक परंपरेचा वारसा समजण्यासाठी अशा स्वरूपाची लोकगीते संकलन करणे गरजेचे आहे.

आदिवासींची संस्कृती नृत्य गीतांनी समृद्ध आहे त्यामुळे आदिवासी लोक गीतांचा अभ्यास करताना आदिवासी नृत्यांचा विचार अपरिहार्यपणे येतोच, ही संस्कृती नृत्य गीत गायब इत्यादी विविध कला कौशल्यातून विकसित झालेली असून ती आजच्या युगातही नव संदेश देणारी आहे. आपली संस्कृती टिकवण्यासाठी आदिवासी जमाती पारंपारिक सण उत्सव सादर करीत आली आहे. टायगर नामक अभ्यासकांनी म्हटले आहे" विश्वास कला नीती कायदा चालीरीती व समाजाचा सभासद म्हणून मानव संपादन करीत असलेल्या सर्व क्षमता व सवयीचा अंतर्भाव म्हणजेच संस्कृती होय"३ अनुभवाच्या आधारे ज्ञानग्रहण करणे आणि अनुभवाचा उदघाट करणे म्हणजेच संस्कृती टायलर या त्याच्यामते आदिवासी संस्कृतीचे ज्ञान ग्रहण करण्यासाठी अनुभव हा अत्यंत महत्त्वाचा आहे आदिवासी संस्कृती ही पूर्व परंपरेने चालत आलेली एक आदर्श संस्कृती आहे समाजाला नवे मूल्य शिकवणारी आहे सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचा लोकसंस्कृतीचा विचार हा प्रेरणादायी आहे माणूस म्हणून जगत असताना जो आदर सन्मान असतो ते आदिवासी लोकगीतातून व्यक्त होताना दिसते .

"कला आणि मनोरंजन हे दोन्हीही संस्कृतीचे घटक आहेत पुरातन काळापासून मानव कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारे स्वतःबरोबर इतरांचे मनोरंजन करीत आला आहे मानवी समाजाच्या उदयापासून विनोदाचा इतिहास सुरू झालेला आहे "४मानवासारखाच मनोरंजनाचा काळ सुद्धा अति प्राचीन मानला जातो म्हणून मनोरंजनासाठी माणूस कोसो दूर अंतर चालत गेले आढळतो आपले जीवन समृद्ध व आरोग्यदायी करण्यासाठी मनोरंजन फार महत्त्वाचे असते त्या अभावी जीवन नीरज बनते उदासिनता येते. मग तो कोणत्या कोणताही समाज असो गोंड,आंध ,परधान, भिल्ल,कोलाम,या आदिवासी जमाती सुध्दा अपवाद नाही.

किनवट परिसरात दसरा ते दिवाळी या कालावधीत एकवीस दिवस आपल्या आदर्श संस्कृतीचा देखावा आदिवासी समाज लोकनृत्यातून करीत असतो. पारंपारिक लोकसंस्कृती जपत असतो. विविध लोककला प्रकारातून लोकरंजन करीत असतो आपल्या जीवनातील विविध घटना प्रसंग गीतातून व्यक्त करून मनहलक करीत असतात. किनवट हा आदिवासी बहुल्पावरून ओळखला जात जातो. दंडार घुसाडी ढेमसा हे लोकनृत्याचे कलाप्रकार येथे सादर होतात . "ज्या दिवशी दंडाराला सुरुवात केली जाते त्या दिवसाला जोगीचा दिवस असे म्हटले जाते दंडार सुरू करण्यापूर्वी एक पूजाविधी केला जातो गोड जमातीमध्ये त्याला 'कोटका पिटेग' असे म्हणतात"५.दंडार या नृत्यप्रकाराला विशेष महत्त्व आहे. विशिष्ट तालाने नृत्य सादर केले जाते या नृत्याला कड्या असे म्हणतात हल्ली चित्रपट दूध चित्रवाणी याचाही प्रभाव दंडार या नृत्य प्रकारावर झालेला जाणवतो .

आदिवासी संस्कृतीत स्त्री ही केवळ कुटुंबाचा भाग नसून ती निसर्ग आणि संस्कृतीची रक्षक आहे. तिच्या लोकगीतांमधून खालील भाव व्यक्त होतात:

निसर्गाशी नाते: आदिवासी स्त्री स्वतःला निसर्गापासून वेगळे मानत नाही. 'रान', 'नदी', आणि 'झाडे' यांच्याशी तिचे नाते आई-लेकीचे असते.

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)

श्रमसंस्कृती: पेरणी, कापणी आणि दळण-कांडण करताना गायली जाणारी गीते तिच्या कष्टाची आणि जगण्याच्या संघर्षाची साक्ष देतात.

सामाजिक वास्तव: पितृसत्ताक पद्धतीतील बंधने, लग्नानंतरचे सासरचे दुःख आणि माहेरची ओढ या भावना या गीतांतून अत्यंत प्रांजळपणे उमटतात.

सामूहिक जाणीव: ही गाणी 'मी' पेक्षा 'आम्ही' या भावनेवर आधारित असतात. समूहाने नृत्य करताना गायली जाणारी गाणी स्त्रीशक्तीचे दर्शन घडवतात.

परधान आदिवासी जमातींमध्ये लग्न विधी प्रसंगी सादर केलेल्या गीतातून स्त्री संवेदना व्यक्त होते.

"जाती रो बाती रियोरे दादा?

जाती रो बाती भिरी रो दादा?"६

हे नवरदेव दादा,तु कोणत्या वर्गाचा आहेस, काही सांगशील का?असे विचारले असता ,मी काही वाईट माणूस नाही.मी एक जबाबदार माणूस आहे.चांदा जिल्ह्यातील रहिवासी आहे. तुमच्या मुली सोबत लग्न करावे वाटते. प्रश्न उत्तरे विचारणारे गीते व्यक्त होतात.

" मा दो वेदूर लाडी

सावाती उदनुल दे

तरहार कन्यादान||१||

मी दो वानदूर लाडी

धादमितीने उदनुर दे

गंजा घोटे कुंदूर दे

तरहार कन्यादान||२||७

या गीतातून वधू वडिलाची काळजी करते. त्याना गांजा घेण्यासाठी रूपये मिळत नाही याची चिंता आहे पण माझ्या लग्नाची काळजी नाही असे दुःख व्यक्त होते.

कोलाम आदिवासी लोकगीतांतील स्त्री जाणीवा व्यक्त होणारे हे एक गीत,

"रे रे ना रेना रे रेना,रेना रेना रे रेना

कसे दानेकी तनावे भीमा

कसे दानेकी तनावे भीमा

'८

आपले दैवत भीम देवाला साकडे घालणारे हे गीत आहे.

गोड आदिवासी लोकगीतातील स्त्री जाणीवा

"पुजा किनतोने जय जंगो माऊली

पुजा किनतोने जय जंगो माऊली

मनी भाव फोटो निवा सावली

मनी भाव फोटो निवा सावली

आरती ओवाळी कितनोने जंगोबाईना

आरती ओवाळी कितनोने जंगोबाईना "९

आपले दैवत जगोबाईकडे सुखी व समाधानी ठेवण्यासाठी येथे भावना व्यक्त होते

"तंबाखूता. मिसाते मा बीये वाता

असे वातरू वाता की ये दादा

ढेमसा सुडले वातारो" १०

व्यसनाधीनतेवर हे गीत आहे.

"बये इदानूर भीमा बये

कली वलया दाका

नालुंग कोण कुण नालुंगा जुगादीग

नटुर दीर उदीर जुगादी

नालुंग कोण कुण नालुंग मुडाण

नडून दीर उडी मुंडा

नालुंग कोण कुण नालुंग समयांग

नडू दीर उदीर समया नालंगू कोण कुण नालुंग झोडोग "११

चार मैत्रिणीच्या बोलण्यातील भाव व्यक्त करणारे गीत आहे. मैत्रिणी एकत्र जमल्या नंतर एकमेकींची मस्करी करतात असा आशय या लोकगीतातून व्यक्त झालेला आहे.

"निंदतो बाई तास - तास

गवताचा येतो वास -वास

भाकरीचा जायेणा घास "१२

आंध आदिवासी जमातीच्या शेतकरी स्त्रीच्या अंतरंग या लोकगीतातून घडते ती शेतात निघत असली तरी तिचा ओढा मायेच्या रस्त्याकडे असतो मनात किती दुःख असले तरी घाम गाळून संसार काढा आवडत असते हे जर मी तिची गीत होय.

"बाई दिवाळीच्या सणाला
बहिण भावाची आठवण
आनंदाने जाईल
मी आनंदाने माहेराला
लाडक्या बंधूला मी ओवाळीन."१३

दिवाळीच्या सणाला जाण्यासाठी माहेराची ओढ व्यक्त होते. एकुलता एक भाऊ त्याला दिपवाळीच्या सणाला ओवाळण्याची माहेरी जाण्याची मनातील जाणीव व्यक्त होताना दिसते.

कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI)भूमिका:

आजच्या काळात आदिवासी लोकगीतांचा वारसा जपण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता एका 'डिजिटल पुराव्यासारखी' वापरली जाऊ शकते:

डिजिटल जतन केले जाते.अनेक आदिवासी बोली भाषांना लिपी नाही. AI मुळे या बोलींमधील गाणी ध्वनीमुद्रित करून त्यांचे संकलन आणि वर्गीकरण करणे सोपे झाले आहे.

अनुवाद आणि प्रसार: AI च्या मदतीने गोंडी, भिल्ली, किंवा वारली यांसारख्या बोलीभाषांमधील गीतांचा अर्थ जागतिक भाषांमध्ये अनुवादित करता येतो. यामुळे त्यातील स्त्री जाणीवा जगासमोर येतात.

एआयमुळे हजारो लोकगीतांमधील शब्दांचा अभ्यास करता येतो.

पुनरुज्जीवन जुन्या आणि पुसट झालेल्या ध्वनीमुद्रणांना एआय द्वारे पुन्हा सुस्पष्ट करता येते.

स्त्री जाणीवा आणि एआय मधील आव्हाने :

जरी एआय मदत करत असले, तरी काही मर्यादा आहेत:

भावनेचा अभाव: एआय शब्दांचे विश्लेषण करू शकते, पण आदिवासी स्त्रीच्या कंठातील 'हळवेपणा' किंवा 'कष्ट' त्याला पूर्णपणे टिपता येत नाहीत.

सांस्कृतिक संदर्भ: अनेकदा लोकगीतांतील शब्दांचे अर्थ स्थानिक संदर्भाशिवाय बदलतात, तिथे एआय ला अचूक अर्थ लावताना अडचण येऊ शकते.

आदिवासी लोकगीतांतील स्त्री जाणीवा या मानवी संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता या ठेव्याला आधुनिक काळातील 'डिजिटल संरक्षक' म्हणून मदत करू शकते. तंत्रज्ञानामुळे या जाणीवा केवळ जंगलापुरत्या मर्यादित न राहता जागतिक साहित्याचा भाग बनू शकतात.

**संदर्भ:**

१) शिंदे, डॉ. विश्वनाथ: लोकसाहित्य मीमांसा, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस,पुणे पृष्ठ क्र.९२

२) Brun,Nettal: music in Gramative Cultural London (1956)pp-5-6

३) johnson,H.M: Sociology- systematic Introduction, Allied publishers pvt.ltd.New Delhi (1983)pp- 82.

४) काचोळे,दा.धो : ग्रामीण समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद,२००९ पृष्ठ क्र.२११

५) साळुंखे, डॉ.संजय भा.: गोंड, संवेदन प्रकाशन, औरंगाबाद २००२, पृष्ठ क्र.१४०

६) शेवगावकर, डॉ.शैलजा : महाराष्ट्रातील आदिवासीचे लोकसाहित्य, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर १९९३, पृष्ठ क्रमांक ५८.

७) तत्रैय पृष्ठ क्रमांक ७१

८) तत्रैय पृष्ठ क्रमांक १०७

९) संकलीत गीत

१०) साळुंखे, डॉ.संजय भा.: गोंड, संवेदन प्रकाशन, औरंगाबाद २००२, पृष्ठ क्र.१५०

११) संकलीत गीत

१२) तत्रैय

१३) तत्रैय

१४), gamini aap,gtp

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)